(असाधारण)

अधिसूचना

क्रमांक : १४८/२०२३ दिनांक. १२/०९/२०२३

विषय :- सी.जी.एस. पद्धतीमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सी.बी.सी.एस. पद्धतीमध्ये द्वितीय वर्षाला प्रवेश देण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदव्युत्तर स्तरावरील शिखर संस्थाद्वारा संचालित अभ्यासक्रम जसे फार्मसी, लॉ, फिजिकल एज्युकेशन, एम.बी.ए., इंजिनिअरिंग याव्यतिरिक्त ईतर सर्व अभ्यासक्रमांस सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करण्यांत आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ हे या प्रणालीचे द्वितीय वर्ष आहे.

या अनुषंगाने सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ व त्यापूर्वीच्या विविध विद्याशाखांमधील स्नातकोत्तर (पदव्युत्तर) स्तरावरील प्रथम वर्षातील जे विद्यार्थी ए.टी.के.टी.नियमाप्रमाणे द्वितीय वर्षाच्या प्रवेशाकरिता पात्र असतील तसेच जे विद्यार्थी सी.जी.एस. प्रणालीमधील प्रथम वर्ष पूर्णपणे उत्तीर्ण असतील, असे विद्यार्थी शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मध्ये सी.बी.सी.एस. प्रणालीतील द्वितीय वर्षाला प्रवेश घेऊ शकतात.

तथापि, जे विद्यार्थी प्रथम वर्ष अनुत्तीर्ण असतील त्यांना सी.जी.एस. प्रणालीतील अनुत्तीर्ण विषय (बॅकलॉग) उत्तीर्ण करावे लागतील. त्याचबरोबर त्यांना तृतीय तसेच चतुर्थ सत्र (सी.बी.सी.एस.) दरम्यान ६० तासांची ०२ क्रेडीटस असलेली इंटर्नशीप/फिल्ड वर्क/प्रोजेक्ट/वर्क एक्स्पीरिएंस हिवाळी २०२३ च्या व्हॅकेशनमध्ये किंवा उन्हाळी २०२४ च्या व्हॅकेशनमध्ये पूर्ण करणे अनिवार्य राहील. सी.जी.एस. प्रणालीतील प्रथम वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांनासुध्दा तृतीय तसेच चतुर्थ सत्र (सी.बी.सी.एस.) दरम्यान ६० तासांची ०२ क्रेडीटस असलेली इंटर्नशीप/फिल्ड वर्क/प्रोजेक्ट/वर्क एक्स्पीरिएंस हिवाळी २०२३ च्या व्हॅकेशनमध्ये किंवा उन्हाळी २०२४ च्या व्हॅकेशनमध्ये पूर्ण करणे अनिवार्य राहील.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

******